2.8 DEC 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजातील साक्षरता वाढवली पाहिजे

## डॉ. दिलीप पाटील यांचे मत : २१ व्या शतकात कौशल्यावर आधारीत शिक्षणाची गरज

प्रतिनिधी
कोल्हापूर

उच्च शिक्षणातील विविध संधी समाजातील वंचित घटकापर्यंत पोहचल्या पाहिजेत. आजच्या काळात साक्षरतेचे प्रमाण वाढणे गरजेचे आहे. समाजातील शेवटच्या घटकाला साक्षर करण्याचे काम आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने केले पाहिजे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. दिलीप पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे आयोजित '२१ व्या शतकातील आजीवन कौशल्ये' या विषयावरील राष्ट्रीय परीषदेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पेनीसिल्वानिया विद्यापीठ, अमेरिका येथील प्रा. मिलींद रानडे होते. यावेळी डॉ. पाटील म्हणाले, २१ वे शतक हे कौशल्यावर आधारीत शिक्षण घेणारे शतक आहे. विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव दिला पाहिजे. या विभागाने शेतकरी, गृहिणी, कारागीर यासारख्या दुर्लक्षित वर्गाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे.




**कोल्हापूर : आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे आयोजित परिषदेत डॉ. दिलीप पाटील यांचा सत्कार करताना डॉ. सुमन बुवा. सोबत प्रा. यशोधन बोकिल, प्रा. मिलींद रानडे, डॉ. रुपाली संकपाळ.**

प्रा. मिलींद रानडे यांनी अमेरिकेत निरंतर शिक्षणात चाललेले नवीन प्रयोगांची माहिती दिली. भाषा आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समाजोपयोगी संशोधन करून समाजाला योग्य दिशा दाखवली पाहिजे. या परीषदेच्या दुसऱ्या सत्रात संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. ज्येष्ठ राजकीय अभ्यासक डॉ. भालबा विभूते यांनी प्रौढ आणि निरंतर शिक्षण प्रक्रिया, विविध शैक्षणिक आयोग, विद्यापीठ अनुदान याविषयी माहिती दिली. अध्यस्थानी विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या. डॉ. सुमन बुवा यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. यशोधन बोकिल, डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. रुपाली संकपाळ, डॉ. के. बी. पाटील उपस्थित होते.


# आर्थिकदृष्ट्या संपन्न होण्यासाठी सुरक्षित गुंतवणूक गरजेची

## डॉ. व्ही.बी.ककडे यांचे प्रतिपादन : वारणा महाविद्यालयात 'अर्थ नियोजन'वर मार्गदर्शन

प्रतिनिधी
वारणानगर

भारतीय बाजारात बँका पैसा सांभाळत असून मॅच्युअल फंड पैसा वाढवत आहेत. त्यासाठी पैसा मिळविण्याची गुरुकिल्ली समजून घेण्याची गरज आहे. आर्थिक दृष्ट्या संपन्न होण्यासाठी सुरक्षित गुंतवणूक करण्याची गरज असल्याचे, प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे ज्येष्ठ प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये 'आर्थिक साक्षरता' उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी 'अर्थ नियोजन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी घोडावत कन्या महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. एस. एस. सूर्यवंशी यांनीही मार्गदर्शन केले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे होत्या.



**वारणानगर : व्याख्यानात बोलताना विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे. सोबत प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे, डॉ. एस. एस. सूर्यवंशी.**

यावेळी डॉ. ककडे म्हणाले, जागतिक पातळीवर आर्थिक साक्षरतेची गरज निर्माण झाली आहे. भारतामध्ये ७८ टक्के लोक सुशिक्षित असले तरीही आर्थिक निरक्षर आहेत. पैशाचा कार्यक्षम वापर करून पैसे वाचविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

डॉ. सूर्यवंशी म्हणाल्या, शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवले की ते बुडतात हा गैरसमज असून त्यासाठीच आर्थिक साक्षर होण्याची गरज आहे. प्रा. सर्जेराव जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. शहापुरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. यावेळी झालेल्या चर्चासत्रात प्रा. डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, डॉ. शर्मिला कुलकर्णी, डॉ. प्रकाश राऊत, कार्यालयीन प्रबंधक बाळासाहेब लाडगावकर, अधीक्षक हरीश गायकवाड, तानाजी शिंदे यांच्यासह कनिष्ठ, वरिष्ठ व व्यवसाय अभ्यासक्रम विभागाकडील प्राध्यापकांनी सहभाग घेतला. डॉ. डी. आर. थेडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

12 8 DEC 2017 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Exam for sports quota students from Jan 9

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will conduct its semester examination for students who were busy in sports activities during the academic calendar from January 9. A circular regarding the same was issued on December 18.

The circular from the SUK exam department stated: "October and November are peak months for various sports competitions. The players, who participate in sports competitions, are busy due to which their semester examinations are missed. Hence, according to the decision from the board of examinations, these students will have to appear for the examination from January 9."

A university official from the examination department said the respective exam centres from the division have been asked to conduct the examination. "The department has attached the schedule and examination centre for these students, where they can appear for the examination. Students can use their old hall tickets — given for October/November semester examination," he said.

"The centres for examination according to the courses have been already finalised. The centres have been decided with respect to the number of students appearing for the examinations," he added.

For engineering students, SUK's Department of Technology will host the exam, while for Arts, Commerce, and Science students, three different colleges have been assigned the responsibilities.

"For Kolhapur district, city-based New College will host the exam, while for Sangli Shrimati Kasturbai Walchand College will host the examination, followed by the Chhatrapati Shivaji College in Satara," stated the circular.

It should be noted that university's October examination commenced from October 4 earlier this year and is in the last stage in the month of December. In fact, results of many examinations are already out.

TOI



The respective exam centres from the division have been asked to conduct the examination

## EXAM CENTRE

- Kolhapur dist: New College
- Sangli dist: Shrimati Kasturbai Walchand College
- Satara dist: Chhatrapati Shivaji College

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

# डहाकेंच्या साहित्यावर उद्या चर्चासत्र

▶▶ कोल्हापूर टाइम्स टीम



वसंत डहाके

साहित्य संस्कृती

ज्येष्ठ कवी, कादंबरीकार आणि समीक्षक वसंत आबाजी डहाके यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांच्या साहित्यावर शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाने एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. शुक्रवार, ता. २९ डिसेंबरला सकाळी साडेदहा वाजता वि. स. खांडेकर भाषाभवनात चर्चासत्र होणार आहे.

आधुनिकता आणि मराठी साहित्य तसेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक जीवनचित्रणाच्यादृष्टीने डहाके यांच्या साहित्याला असाधारण महत्त्व आहे. कविता, कांदबरी, ललित गद्य, आणि समीक्षा या प्रकारातील त्यांची निर्मिती वैशिष्ट्यपूर्ण आहे. साठनंतरच्या भारतीय समाजाच्या स्थितीगतीचे व भविष्यातील दिशांचे सूचन त्यांच्या साहित्यात आहे. वैशिष्ट्यपूर्ण आशयभावनांबरोबरच रुपबधांच्या दृष्टीने त्याचे वाङ्मय महत्त्वाचे आहे.

तसेच त्यांच्या वाङ्मयीन कामगिरी स्वरुपाचा शोध घेतला जाणार आहे. त्यामुळे अर्धशतकाच्या महत्त्वाच्या लेखकाच्या समग्र निर्मितीची चर्चा व्हावी, या उद्देशाने या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. चर्चासत्राचे बीजभाषण ज्येष्ठ कवयित्री डॉ. प्रभा गणोरकर करणार आहेत.

चर्चासत्रात वसंत आबाजी डहाके यांचे काव्यलेखन, ललित गद्य, कादंबरी लेखन, समीक्षा भाषांतर कार्य या विषयावर डॉ. वसंत पाटणकर (मुंबई), प्रा. डॉ. सुषमा करोगल (बडोदा), डॉ. अविनाश कोल्हे (मुंबई), डॉ. नीतीन रिंढे (मुंबई) प्रा. प्रवीण बांदेकर (सावंतवाडी), प्रा. अविनाश सप्रे (सांगली) हे नामवंत अभ्यासक निबंध सादर करणार आहेत. चर्चासत्रास उपस्थित रहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. राजन गवस यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

# महर्षी शिंदे ग्रंथाचे प्रकाशन मंगळवारी

▸▸ कोल्हापूर टाइम्स टीम



महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्याय महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने २ जानेवारीला सकाळी ११.३० वाजता राजर्षी शाहू सभागृह (सिनेट हॉल), येथे रा. ना. चव्हाण लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे एक दर्शन, भाग-२' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ व व्याख्यान कार्यक्रम आयोजित केला आहे.

ग्रंथाचे प्रकाशन डॉ. माणिकराव साळुखे (कुलगुरू, भारती अभिमत विद्यापीठ) यांच्याहस्ते होणार आहे. या प्रसंगी प्रा. पुष्पा भावे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. या प्रसंगी डॉ. गो. मा. पवार (सोलापूर) तसेच महर्षी शिंदे यांचे नातू निवृत्त एअर कमोडोर अशोक शिंदे व नात सुजाता पवार उपस्थित राहणार आहेत. हा समारंभ प्र-कुलगुरु डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होत आहे. कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2017
सकाळ

# नेट-सेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठातील दूर शिक्षण केंद्रातर्फे एम.ए. व एम.कॉम.च्या विद्यार्थ्यांसाठी नेट-सेट परीक्षा तयारी मार्गदर्शन कार्यशाळा होणार आहे. २ व ३ जानेवारी २०१८ रोजी कार्यशाळा होईल, अशी माहिती संचालक प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे यांनी दिली.

दूर शिक्षण केंद्रात सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत कार्यशाळेत डॉ. गजानन राशिनकर, प्रा. डॉ. शशिकांत अन्नदाते, डॉ. मारुती लोंढे हे प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत. कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही. अधिक माहिती व नावनोंदणीकरिता समन्वयक डॉ. कृष्णात पाटील व महेश चव्हाण यांच्याशी संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात नेट-सेट कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील एम. ए. आणि एम. कॉम.च्या विद्यार्थ्यांसाठी नेट-सेट परीक्षेच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दि. २ व ३ जानेवारी २०१८ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्रात होणार आहे. कार्यशाळेत डॉ. गजानन राशिनकर, डॉ. शशिकांत अन्नदाते, डॉ. मारुती लोंढे आदी प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा निःशुल्क आहे. मात्र, त्यासाठी नावनोंदणी आवश्यक आहे, अशी माहिती संचालक प्रा. एम. ए. अनुसे यांनी दिली.

28 DEC 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मुक्तज्ञान कोशावर' नोंदी लेखन कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २७ : मराठी भाषा पंधरवड्याच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे विकिपीडिया या मुक्तज्ञान कोशावर कोल्हापूर विषय नोंदींचे लेखन समाविष्ट करण्यात येईल. हा ज्ञानकोश समृद्ध करण्यासाठी हा निर्णय मराठी विभागाने घेतला.

शासनातर्फे दरवर्षी १ जानेवारी ते १५ जानेवारी हा मराठी भाषा पंधरवडा साजरा केला जातो. यंदा हा पंधरवडा शिवाजी विद्यापीठातर्फे अभिनव पद्धतीने साजरा केला जाणार आहे. यासाठी 'मराठी भाषा पंधरवडा - २०१८'निमित्त महाराष्ट्र शासनाची राज्य मराठी विकास संस्था आणि शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाने १५ जानेवारी २०१८ रोजी विकिपीडिया नोंद लेखन विषयक कार्यशाळा आयोजित केली आहे.



कार्यशाळेत प्रत्यक्ष नोंद लेखनाच्या प्रशिक्षणाबरोबरच विकिपीडिया या मुक्तज्ञान कोशाकडे स्वत:चे खाते उघडणे, नोंदी समाविष्ट करणे, असलेल्या नोंदीत भर घालणे, नोंदी संपादित करणे, छायाचित्रांचा समावेश नोंदीत करणे, स्वत:चे पान उघडणे, परिसरातील नोंदींचे संकलन करणे या संदर्भात मार्गदर्शन केले जाईल. कार्यशाळेतच कोल्हापूर जिल्ह्याची परिपूर्ण ओळख करून देणाऱ्या नोंदी प्रात्यक्षिक म्हणून विकिपीडियावर समाविष्ट करण्यात येतील. कोल्हापूरचा इतिहास, राजर्षी शाहू महाराज, शाहू महाराजांचे कार्यकर्तृत्व, नवा राजवाडा, अंबाबाई, रंकाळा, खासबाग मैदान, केशवराव भोसले नाट्यगृह, गूळ, गुऱ्हाळघरे, कुस्ती, तालीम संस्कृती, शिवाजी विद्यापीठ, येथील खाद्यसंस्कृती, भाषा, कोल्हापुरी चप्पल, दैवते, जोतिबा, पन्हाळा, संस्कृती, कोल्हापुरातील पारंपरिक व्यवसाय, पर्यटन अशा गोष्टी विकिपीडिया या मुक्तज्ञान कोशात समाविष्ट करण्याचे ठरवले आहे. या नोंदींचे लेखन आणि शक्य असल्यास युनिकोडमध्ये टंकलेखन करून शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातील डॉ. नंदकुमार मोरे यांच्याकडे जमा करावे किंवा nvm_marathi@unishivaji.ac.in या मेलवर पाठवावे. १० जानेवारी २०१८ पर्यंत हे पाठवावे, असे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

# तरुणांना उद्योजकता प्रशिक्षण आवश्यक

**कोल्हापूर :** नोकरीची मानसिकता बदलून तरुणांनी उद्योजक होण्यासाठी उद्योजकता प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. तसेच कोणत्याही क्षेत्रात उद्योजकता अंगी असल्याशिवाय यशस्वी होता येणार नाही, असे प्रतिपादन सांगरुळ शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी प्रा. जयंत आसगावकर यांनी केले.

कोपार्डे (ता. करवीर) येथील स. ब. खाडे महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत कॉमर्स विभागाच्यावतीने आयोजित केलेल्या उद्योजकता या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी आसगावकर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. डी. कुरळपकर होते. शिवाजी विद्यापीठाच्या कॉमर्स विभागाचे प्रा. डॉ. के. व्ही. मारूलकर, प्राचार्य डॉ. डी. डी. कुरळपंकर, सुधाकर भादरगे यांनी उद्योजकीय कौशल्ये विकास याविषयी मार्गदर्शन केले. न्यू कॉलेजचे डॉ. अनिल सूर्यवंशी यांचेही भाष्ण झाले. प्रास्ताविक प्रा. बी. एम. कुंभार यांनी तर आभार उपप्राचार्य डॉ. बी. के. काटकर यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2017
सकाळ




कोल्हापूर : जळगाव येथे झालेल्या आंतरविद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेतील शिवाजी विद्यापीठ संघातील यशस्वी खेळाडूंसह मान्यवर.

# बॅडमिंटनमध्ये शिवाजी विद्यापीठ उपविजेते

कोल्हापूर, ता. २७ : महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघास उपविजेतेपद मिळाले. या स्पर्धेसाठी गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्रातील ८१ पुरुष, ७८ महिला संघांनी सहभाग घेतला. गतवर्षी नांदेडला झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा संघ उपविजेता ठरल्यामुळे या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठास थेट उपउपांत्य फेरीत प्रवेश मिळाला. या फेरीत शिवाजी विद्यापीठाने आर.टी.एस. नागपूर विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव संघांना तुल्यबळ लढत देऊन पराभूत केले. उपांत्य फेरीत शिवाजी विद्यापीठाचा सामना राजस्थान विद्यापीठ, जयपूर या तुल्यबळ संघाशी झाला. अटीतटीच्या या सामन्यात शिवाजी विद्यापीठास उपविजेतेपद मिळाले. ५ ते ९ जानेवारी या कालावधीत भुवनेश्वर (आसाम) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ पात्र ठरला. प्रशिक्षक डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजचे प्रा. राजेंद्र रायकर, संघ व्यवस्थापक डी. डी. शिंदे सरकार कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. दीपक देसाई यांचे मार्गदर्शन, तर शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा संचालक प्रा. पी. टी. गायकवाड, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेत ओंकार कापरेला रौप्य

**कोडोली / प्रतिनिधी:**



चंदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेत शहाजी महाविद्यालयाच्या ओंकार ऊर्फ विकी कापरे याने ९० किलोंवरील वजन गटात रौप्यपदक मिळविले. त्याला शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मानसिंग बोंद्रे, प्रशिक्षक विजय मोरे, मानद सचिव विजयराव बोंद्रे, प्रभारी प्राचार्य एकनाथ काटकर, जिमखानाप्रमुख प्रा. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2017
लोकमत

# 'शिवाजी'स उपविजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जळगाव येथे झालेल्या पश्चिम भारत विभागीय आंतरविद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने उपविजेतेपद पटकविले. ही स्पर्धा दि. १९ ते २३ डिसेंबरदरम्यान झाली.

गेल्या वर्षी नांदेड येथे झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा संघ उपविजेता ठरल्याने या स्पर्धेत विद्यापीठाला सरळ उपउपांत्य फेरीत प्रवेश मिळाला. या फेरीत विद्यापीठाच्या संघाने आरटीएम नागपूर विद्यापीठ; उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या संघाचा पराभव केला. उपांत्य फेरीत शिवाजी विद्यापीठाच्या संघाचा सामना जयपूरच्या राजस्थान विद्यापीठाशी झाला. अटीतटीच्या या सामन्यात शिवाजी विद्यापीठाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या संघाला प्रशिक्षक राजेंद्र रायकर, संघव्यवस्थापक दीपक देसाई यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

# झोनल क्रिकेट स्पर्धेत नाइट कॉलेज अजिंक्य

मटा स्पोर्ट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत कोल्हापूर झोनल क्रिकेट स्पर्धांमध्ये नाइट कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स कोल्हापूरच्या संघाने अंतिम सामन्यात महावीर कॉलेजचा सहा धावांनी पराभव करून अजिंक्यपद पटकावले. या संघाची इंटरझोनल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अर्जुननगर येथे झालेल्या चुरशीच्या सामन्यात नाइट कॉलेजच्या संघाने पदार्पणातच ऐतिहासिक कामगिरी करीत विजेतेपद खेचून आणले. विजयी संघात चेतन नार्वेकर (कर्णधार), वैभव पाटील, रंजित निकम, मुस्तफा देसाई, तुषार नाईक, मंजुनाथ यादव, विश्वजित जगताप, आशितोष अंबपकर, प्रथमेश दिवेकर, साहील पाटील, हर्षद पठाण, प्रवीण गावडे, कुणाल पाटील, शुभम पाटील, विरेनसिंग रजपूत यांचा समावेश आहे.

विजयी संघाचा सत्कार कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष प्रसाद कामत, संचालक अॅड. व्ही. एन. पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्याहस्ते करण्यात आला.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2017
तरुण भारत

# डॉ. मगदूम अभियांत्रिकीमध्ये आज 'अविष्कार' संशोधन स्पर्धा

**जयसिंगपूर :** येथील डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये शिवाजी विद्यापीठातर्फे कोल्हापूर विभागीय 'अविष्कार २०१७/१८' या आंतरमहाविद्यालयीन संशोधन स्पर्धेचे आयोजन २८ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. स्पर्धेमध्ये विद्यार्थी संशोधक आपले संशोधन, पोस्टर्स, मॉडेल्सची मांडणी करू शकतात, अशी माहिती प्रभारी प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांनी दिली. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष विजय मगदूम, उपाध्यक्षा ॲड. सोनाली मगदूम, डॉ. पी. एस. पाटील, डिन, सायन्स, इंजिनिअरींग, वैद्यकीय विद्याशाखा शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. डॉ. रमेश पुदाले, आमदार डॉ. सुजित मिणचेकर, डॉ. ए. एम गुरव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. स्पर्धेमध्ये विद्यार्थी संशोधक आपले संशोधन, पोस्टर्स, मॉडेल्सची मांडणी करू शकतात. यातील विषय असे – मानव्यशास्त्र व भाषा, वाणिज्य, व्यवस्थापन कायदा, मुलभूत विज्ञान, कृषी व पशू संवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यक व औषध निर्माण शास्त्र या विषयांतर्गत शोध निबंधन सादरीकरण करू शकतील. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. एस. आर. महाडिक, प्रा. व्ही. जे. खोत यांचे विशेष प्रयत्न करीत आहेत.




शैक्षणिक

# शिवाजी विद्यापीठ 'लोकली टू ग्लोबली'



## शिवाजी विद्यापीठाच्या यशाचा आलेख उंचावला | जागतिक पातळीवरील स्पर्धेत महाराष्ट्रातून शिवाजी विद्यापीठाचा सहभाग



सरत्या वर्षात शिवाजी विद्यापीठाला जागतिक दर्जाच्या उच्चशिक्षण संस्थांच्या निर्मितीसाठी नरेंद्र मोदी सरकारने आखलेल्या महत्वकांक्षी योजनेमध्ये देशभरातून शंभरहून अधिक नामवंत संस्थांनी सहभाग नोंदवला आहे. देशभरातून २० संस्थांची निवड करून त्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी एक हजार कोटी रूपयांचे विशेष अनुदान दिले जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातून शिवाजी विद्यापीठाचाही समावेश असल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यापीठाने वर्षभर शैक्षणिक, सामाजिक, क्रिडा, संशोधन, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाची कामगिरी केली. रूसा अंतर्गत २ कोटींचे अनुदानमिळालेआहे. तसेचशिवाजीविद्यापीठासह पुणे व मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा पदभार कुलगुरू देवानंद शिंदे यांनी सांभाळला. त्यामुळे शैक्षणिकदृष्ट्या शिवाजी विद्यापीठ महाराष्ट्रात नंबर वन' विद्यापीठ असल्याचे सिध्द झालेआहे. त्यामुळे विद्यापीठाचा नावलौकिक झाला आहे. एकंदरीत शिवाजी विद्यापीठाची वाटचाल 'लोकली टू ग्लोबली' अशी सुरु आहे.

-अहिल्या परकाळे



कोल्हापूर : खासगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर महासंघातर्फे विविध मागण्यांसाठी कडक लक्ष्मीच्या वेशभूषेत शिक्षकांनी केलेले आंदोलन.

### वर्षभरातील प्रमुख घटनाक्रम

- ६ एप्रिल : शिवाजी विद्यापीठ व ॲक्सिस बँक यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिक्षेत्रात 'डिजीटल अवेअरनेस प्रोग्राम" राबविण्यात आला. केंद्र सरकारच्या कॅशलेस आर्थिक व्यवहाराच्या धोरणाला बळकटी देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे सर्व आर्थिक व्यवहार कॅशलेस झाले आहेत.
- १० ते १४ फेब्रुवारी : शिवाजी विद्यापीठात १० ते १४ फेब्रुवारी दरम्यान ३२ वा अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ युवा महोत्सव झाला. या महोत्सवात देशभरातील ७७ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले होते.
- १ मार्च : राज्यभरातील विद्यापीठांनी 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६" नवीन कायद्याची अंमलबजावणी केली. नवीन कायद्यानुसार कुलगुरू नियुक्त अधिष्ठात्यांची नेमणूक करण्यात आली. तसेच बऱ्याच पदांचेही नामकरण करण्यात आले आहेत.
- १५ मार्च : शिवाजी विद्यापीठाच्या इंटरनॅशनल अफेअर्स कक्षातर्फे 'आंतरराष्ट्रीय विद्यार्थी परिषद" झाली.
- १७ एप्रिल : केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री जावडेकर यांनी नवी दिल्ली येथून मंत्रालयाच्या मुख्यालयातून शिवाजी विद्यापीठासह देशभरातील १७ विद्यापीठांमधील 'रुसा"अंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध सुविधांचे डिजीटल उद्घाटन केले. केंद्र सरकारने संशोधकीय पायाभूत सुवियांसाठी सुमारे २८०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.
- १९ एप्रिल : शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियाना अंतर्गत (रुसा) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी समावेशी शिक्षण संसाधन केंद्राचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.
- १३ मे : शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील नवीन महाविद्यालये, विद्याशाखा आणि अभ्याक्रमांची निश्चिती होणार आहे. त्यासाठी सन २०१७-१८ ते २०२१-२२ या पाच वर्षे कालावधीत स्वीकारावयाच्या प्रस्तावांचा शैक्षणिक बृहत आराखडा तयार करण्यात आला.
- ३१ मे : शिवाजी विद्यापीठात एमआयटी आणि आयसीटीच्या सहकार्याने गुळ गुणवत्ता तपासणी केंद्र उभारणीसाठी तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. हा निर्णय शिवाजी विद्यापीठात डॉ. काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला.
- ८ जून : शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर सांगली, सातारा या तीन जिल्ह्यातील १८ महाविद्यालये गतवर्षीपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाशी संलग्नीत झाली आहेत.
- १८ जून : विद्यापीठाच्या स्वतंत्र ऑनलाइन बुक स्टोअरचे उद्घाटन करून लोकार्पण करण्यात आले.
- २१जून : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रांतर्गत नवीन १३ अभ्यासकेंद्रांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली.
- २६ जून : विद्यापीठाच्या अधिसभेत नवीन विद्यापीठ कायद्याच्या अंमलबजावणीनुसार शैक्षणिक बृहत आराखडा एकमताने मंजूर करण्यात आला.
- १ ऑगस्ट : शिवाजी विद्यापीठातील विविध विभागातील पदोन्नती प्रक्रियेत खुल्या प्रवर्गातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना डावल्याचा आरोप करीत सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाने विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले. हे आंदोलन चांगलेच गाजले.
- ११ ऑगस्ट : डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्र-कुलगुरू पदाचा पदभार स्विकारला.
- १२ ऑगस्ट : विद्यापीठाच्या सर्वच ऑनलाईन प्रवेशापासून ते परीक्षाच्या निकालापर्यंतची काम शासनाने एमकेसीएलला दिली होती. यातील चुकांच्या वाढत्या संख्येमुळे २०१७-१८मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेतून एमकेसीएलला डच्चू दिला आहे.
- ७ सप्टेंबर : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांना वाय-फाय सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने रिलायन्स जिओशी सामंजस्य करार.
- ३१ ऑक्टोबर : राष्ट्रीय मूल्यांकन परिषद (नॅक) बेंगलोर समितीने जाहीर केलेल्या नॅक मूल्यांकनाच्या निकालात शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील १२ महाविद्यालयांना नॅकचे 'अ" मानांकन मिळाले.
- २६ नोव्हेंबर : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करीत शैक्षणिक वर्ष २०१७-१८मधील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका मेरीटनुसार घेण्यात याव्या, असा अध्यादेश राज्यपाल विद्यासागर राव यांनी जारी केला आहे.
- १७ नोव्हेंबर :नवीन कायद्यानुसार अधिसभा निवडणुकीला २२ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली व १७ नोव्हेंबरला मतदान झाले. तर २० नोव्हेंबरला निकाल लागला. यामध्ये विद्यापीठ विकास आघाडीने विद्यापीठावर आपली सत्ता प्रस्थापित केली. तर सुटानेही आपला बालेकिल्ला राखला.
- १६ डिसेंबर : जागतिक दर्जाच्या उच्चशिक्षण संस्थांच्या निर्मितीसाठी नरेंद्र मोदी सरकारने आखलेल्या महत्वकांक्षी योजनेमध्ये महाराष्ट्रातून शिवाजी विद्यापीठासह अन्य नऊ विद्यापीठांचा समावेश.

### एसआरपीडीचा यशस्वी प्रयोग

पर्यावरणपूरक परीक्षा करण्यासाठी परीक्षा विभागाने सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलिव्हरी (एसआरपीडी) आदींचा प्रभावी वापर करण्याचा निर्णय घेतला. या प्रयोगाला सुरूवातीला विरोध झाला असला तरी काही त्रुटींसह जवळपास हा प्रयोग यशस्वी झाल्याचे चित्र आहे.

### विद्यापीठ परिक्षेत्रात फसलेले प्रयोग

सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलिव्हरी (एसआरपीडी) आदींचा प्रभावी वापर होत आहे. हा प्रयोग यशस्वी झाला असला तरी काही प्रमाणात यामध्ये पेपर फुटीसारखे प्रकार घडल्याचे उघडकीस आले. तसेच राज्य शासनानाच्या योजनेला बळकटी देण्यासाठी सुरू केलेले युवक कौशल्य विकास केंद्र सिल करण्यात आले. विद्यापीठ निवडणूक काळात सुटाचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष प्रा. रघुनाथ ढमकले यांना सुटाने निलंबित केल्याने संघटनेतील बंड चांगलेच गाजले. तसेच या निमित्ताने संघटनेतील धुसफुस चव्हाट्यावर आली.

### विद्यापीठ जैवविविधतेत अव्वल

शिवाजी विद्यापीठ परिसर जैवविविधतेने नटलेला असून १ हजार वनस्पती व १२०० मोर असल्याचे सर्वेक्षणात सिध्द झाले आहे. तसेच प्लास्टिकमुक्त कोल्हापूर ही संकल्पना प्रशासनाकडून यशस्वीपणे राबवली जात आहे.

# शिक्षण क्षेत्र ठरले आंदोलनाचे वर्ष

भाजप सरकारने शिक्षण क्षेत्रावर विविध प्रयोग करीत दररोज एक अध्यादेश काढल्यामुळे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे २०१७ वर्ष शैक्षणिक कामापेक्षा अशैक्षणिक कामातच गेले. माध्यमिक व प्राथमिक शिक्षकांनी काढलेले मोर्चे व केलेली आंदोलने लक्षणीय ठरली. मुख्याध्यापक संघातर्फे नोव्हेंबरमध्ये मुख्याध्यापकांचे अधिवेशन पार पडले. वर्षाच्या अखेरीस कोल्हापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या त्रैवार्षिक निवडणुकीत ४९ वर्षानंतर पहिल्यांदाच सत्तांतर झाले. राजर्षी शाहू सत्तारुढ पॅनेलचा २२ जागांवर पराभव करीत राजर्षी शाहू लोकशाही स्वाभिमानी आघाडीने आपली सत्ता प्रस्थापित केली. तर सत्तारूढ गटाला केवळ ३ जागांवर समाधान मानावे लागले.

### ठळक घडामोडी

- १८ ते २० जानेवारी : निमसरकारी कर्मचारी व शिक्षक समन्वय समितीतर्फे संप.
- २८ फेब्रुवारी : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यासंदर्भात २७ फेब्रुवारी काढलेल्या अन्यायकारक शासन निर्णयाविरोधात आंदोलन .
- ४ मे : शासनाने २८ एप्रिल रोजी शिक्षण आयुक्त, संचालक विद्या प्राधिकरण पुणे यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कला व शारीरिक शिक्षण व आरोग्य शिक्षण विषयाच्या तासिका कमी करणारे परिपत्रक प्रसिध्द केले आहे. या परिपत्रकाच्या विरोधात जिल्हा शैक्षणिक व्यासपीठतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा. हा वादग्रस्त विषय अतिशय गाजला, प्रचंड विरोधानंतर निर्णय मागे.
- २२ ते २६ जुलै : पावसाळी अधिवेशनावर अनुदान मिळावे म्हणून आळंदी ते मुंबई मंत्रालयावर सायकल रॅली काढण्यात आली. या रॅली दरम्यान जोपर्यंत विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळत नाही तोपर्यंत पायात चप्पल न घालण्याचा निर्णय खंडेराव जगदाळे यांनी घेतला. पायात चप्पल न घालण्याचे आंदोलन आजतागायत सुरूच आहे. तसेच वेतनेत्तर अनुदान, शिक्षक भरतीबंदी उटवा यासह अन्य मागण्यासाठी शाळा बंद आंदोलन.
- ४ ऑक्टोबर : कायम विनाअनुदानित शाळांना २० टक्के अनुदान मिळावे यासाठी औरंगाबाद येथे मोर्चा काढल्याबद्दल ४ ते १६ ऑक्टोबर पोलीस कोठडी.
- ७ ऑक्टोबर : ऑनलाईन कामासाठी स्वतंत्र शिक्षक नेमावा या मागणीसाठी सर्व प्राथमिक शिक्षक संघटना कृती समितीची निदर्शने. हा प्रश्न प्रचंड वादग्रस्त आहे.
- २६ ते २८ ऑक्टोबर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघातर्फे ५७ वे वार्षिक राज्यस्तरीय मुख्याध्यापक अधिवेशन झाले.
- ४ नोव्हेंबर : जुनी पेन्शन योजना द्या यासह शिक्षकांचा पाच मागण्यासाठी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात १० हजार शिक्षक सहभागी होते.
- १३ ते १७ नोव्हेंबर : कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळावे म्हणून विविध प्रकारचे आंदोलन.
- १३ डिसेंबर : कायम विनाअनुदानित शाळांच्या शिक्षकांचा दंडवत मोर्चा व ठिय्या आंदोलन. त्यामुळे १ व २ जुलै रोजी घोषीत शाळांना अनुदान देण्याचा निर्णय शिक्षणमंत्र्यांनी घेतला. कनिष्ठ महाविद्यालयाच्या अनुदानास पात्र यादया घोषीत करण्यास मान्यता.
- २७ डिसेंबर : शिक्षण बचाव संघर्ष समिती यांच्यातर्फे कंपन्यांना शाळा काढण्यास परवानगी दिल्याबद्दल अध्यादेशाची होळी.